# महात्मा बसवेश्वरांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना मंगळवारी अभिवादन करण्यात आले. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. जगन कराडे, आदी उपस्थित होते.

Kolhapur Main
Page No. 4 May 08, 2019
Powered by: erelego.com

लोकमत




डीकेटीईमधील टेक्स्टाईल विभागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची ट्रायडेंट या कंपनीमध्ये प्रशिक्षणासाठी निवड झाली.

# डीकेटीईच्या आठ विद्यार्थ्यांची निवड


लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी :** डीकेटीई टेक्स्टाईल विभागात तिसऱ्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या आठ विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय ट्रायडेंट या कंपनीमध्ये प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहून ट्रायडेंटकडून दोन महिन्यांच्या प्रशिक्षणाबरोबर एक लाख रुपये विद्यावेतनही देण्यात येणार आहे.

गुणवत्तापूर्ण उत्पन्नामुळे ट्रायडेंट ही संस्था प्रसिद्ध आहे. ही कंपनी टेरी टॉवेल व शिटिंग फॅबरिक उत्पादन करते. कंपनीने डीकेटीईस भेट दिली व ६० विद्यार्थ्यांना ऑनलाईन टेस्टसाठी निवडले होते. यामधून विद्यार्थ्यांची सायकोमेट्रिक टेस्टसाठी निवड केली.

तज्ज्ञांनी मुलाखत घेऊन जीनेश ललवानी, पनप सालेचा, विश्वजित सांगवे, रोहन खराडे, श्रेयांश रंका, तेजस्विनी पसारे, सूरज कोठारी व शंतनू साठे या विद्यार्थ्यांची निवड केली. विद्यार्थ्यांना प्रा. एस. बी. अकिवाटे, प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले, प्रा. डॉ. यु. जे. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# रुरल डेव्हलपमेंटमधील करिअर संधी



डॉ. नितीन माळी/उमेश गडेकर


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट स्कूलची स्थापना २०१३ साली झाली. तंत्रज्ञान, व्यवस्थापन, संगणकीय शिक्षण, अर्थशास्त्र, समाजशास्त्र ह्या सर्व विद्याशाखांचा समावेश असणारे कोर्सेस, एम टेक (रुरल टेक्नॉलॉजी) एमबीए (रुरल मॅनेजमेंट), एमसीए हे (अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यताप्राप्त कोर्सेस तसेच एमएसडब्लू (रुरल कम्युनिटी डेव्हलपमेंट), एमआरएस हे विद्यापीठ पातळीवरील कोर्सेस सुरू करण्यात आले.

वायसीएसआरडी या स्कूलचे संचालक प्रकाश पवार तसेच सर्व कोर्सेसचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. एस. एस. महाजन यांच्या मार्गदर्शनामुळे वायसीएसआरडी हा ग्रामीण शिक्षणामध्ये आयआरएमए आनंद, गुजरातनंतर देशामध्ये एक नामांकित शिक्षण संस्था म्हणून ओळख निर्माण करेल यात शंकाच नाही.

अत्यंत कमी कालावधी मध्ये वायसीएसआरडी अंतर्गत असणाऱ्या कोर्सेससाठी महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांनी इथल्या कोर्सेसला प्रवेश घेऊन प्रवेश मर्यादा पूर्ण क्षमतेने भरली जाते. विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये प्लेसमेंटच्या संधी उपलब्ध होत आहेत. इंडस्ट्रियल टूर, विविध नामांकीत संस्थांबरोबर सामंजस्य करार तसेच रुरल डेव्हलपमेंट्चे विविध प्रोजेक्ट्स या स्कूलच्या माध्यमातून केले जातात. संशोधन, कन्सल्टन्सी, ट्रेनींग अशा माध्यमातून इथले प्राध्यापक ग्रामिण भागाच्या विकासामध्ये मोलाचे योगदान देतात.

## एमबीए (रुरल मॅनेजमेंट)

ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांचे व्यवस्थापन कौशल्य व बारकावे व महत्व समजावून देण्यासाठी हा अभ्यासक्रम आखण्यात आला आहे. पणन, मानव विकास, वित्त व्यवस्थापन, कृषीपूरक उद्योग (Agribussiness Management) या विषयांचा समावेश आहे. तसेच अर्थव्यवस्था, अकाउंट्स, यावरोबरच प्रोफेशनल कम्युनिकेशन स्किल्स यांचाही अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम दोन वर्षांचा असुन प्रत्येक वर्ष दोन सत्रांमध्ये विभागले आहे. विद्यार्थ्यांकडून शंभर गुणांचे दोन प्रकल्प करून घेतले जातात. या अभ्यासक्रमामध्ये शासकीय निमशासकीय बँकिंग तसेच खाजगी क्षेत्रामध्ये अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत..




**मटा एज्युकेशन**

## एमसीए

हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून प्रत्येक वर्ष दोन सत्रांमध्ये विभागले आहे. यामध्ये कम्पुटर ॲप्लिकेशन संबंधित विषयाबरोबरच अर्थशास्त्र, अकाउंट्स यांबरोबरच प्रोफेशनल कम्युनिकेशन स्किल्स याचाही अभ्यासक्रमामध्ये समावेश करणेत आला आहे. ग्रामिण विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रामध्ये करिअर करण्याच्या दृष्टीनेही अभ्यासक्रम महत्वाचा आहे. अध्यापनाबरोबरच शैक्षणिक भेट, औद्योगिक भेट, तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळते. विद्यार्थ्यांकडून प्रकल्प करून घेतला जातो. या अभ्यासक्रमाची महत्वपूर्ण बाब म्हणजे स्वयंरोजगाराबरोबरच विविध शासकीय सेवांमध्ये विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणामध्ये संधी उपलब्ध आहेत.

## एमटेक (रुरल टेक्नॉलॉजी)

ग्रामिण विकास व तंत्रज्ञानशी निगडीत असा हा अभ्यासक्रम आहे. पर्यावरण पूरक व अपारंपरिक उर्जा डोळ्यासमोर ठेवून जैविक इंधन, सोलर डरायर, कचऱ्यापासून तेल, ग्रामिण तंत्रज्ञान पार्क असे नवीन उपक्रम या कोर्सेसमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. या अभ्यासक्रमाला एआयसीटीई (अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची व डीटीई महाराष्ट्र यांची मान्यता आहे.

## MSW व्यावसायीक समाजकार्याचे प्रशिक्षण

भारतीय समाजाला समाज सेवेचा मोठा वारसा आहे. विविध धर्मातून दातृत्वाची मोठी परंपरा आपल्या देशाला लाभली आहे. समाजातील वाईट रूढी, परंपरा नष्ट व्हाव्या, वंचित घटकांना मुख्य प्रवाहात येत यावे यासाठी अनेक समाजसुधारकांनी आपले योगदान दिले आहे. काळाबरोबर समाजसेवेचे स्वरूप बदलले आहे. पारंपारिक पद्धतीची समाजसेवा बदलून ती आता व्यावसायिक समाजकार्य म्हणून ओळखली जाते. समाजाच्या हितासाठी काम करत करत उदरनिर्वाहाबरोबर सेवेचा आनंद देखील मिळतो आहे. अनेक मोठ्या स्वयंसेवी संस्था, परदेशी संस्था समाजाच्या विविध विकास प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात निधी पुरवत आहेत. या निधीतून शिक्षण, आरोग्य, गरिबी निर्मुलन अशा विविध विषयांवर काम केले जाते. त्यामुळे या क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी कुशल मनुष्यबळाची गरज आहे. अशा प्रकारच कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याचं काम यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटसमाजकार्य अभ्यासक्रम करतो आहे. समाजकार्य (MSW) हा दोन वर्षांचा पदव्युत्तर पदवीचा अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमासाठी कोणत्याही शाखेतून पदवी झालेला विध्यार्थी प्रवेश घेऊ शकतो. एप्रिल, मे दरम्यान प्रवेशपूर्व परीक्षा घेतली जाते. पदव्युत्तर पदवी करताना यामध्ये विवीध उपविषयांचा अंतर्भाव असतो. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेन्टमधील समाजकार्य अभ्यासक्रमामध्ये आपणास ग्रामीण विकास या विषयात पदव्युत्तर पदवी (MSW) करता येईल. या अभ्यासक्रमामध्ये विध्यार्थ्यांना वर्गातील शिक्षणाबरोबरच समाजातील विविध घटकांसोबत तसेच सामाजिक संस्थामधे क्षेत्रकार्य करावे लागते. त्यातून विद्यार्थी समाजकार्य करण्यासाठी कुशल होतो.

## MRS ग्रामीण अभ्यासाची संधी

हा अभ्यासक्रम भारतामध्ये फक्त ८-९ विद्यापीठामध्ये व महाविद्यालय मध्ये उपलब्ध आहे. या अभ्यासक्रमामध्ये प्रामुख्याने ग्रामविकासाचे मूल्यमापन व नियोजन,शेती व शेतीपूरक व्यावसाय, सहकार, NGO, MICROFINANCE, बचत गट इत्यादींच्या अध्यापनाबरोबरच शैक्षणिक भेट, औद्योगिक भेट, तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळते. हा अभ्यासक्रम दोन वर्षांचा असून विद्याथ्याकडून तीनशे गुणांचा प्रकल्प करून घेतला जातो. या अभ्यासक्रमाची महत्वपूर्ण बाब म्हणजे स्वयंरोजगाराबरोबरच शासकीय सेवेमध्ये विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणामध्ये संधी उपलब्ध आहेत. हे कोर्सेस ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना निश्चितपणे रोजगारक्षम बनविणारे आहेत.

(लेखक यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, शिवाजी विद्यापीठ येथे कार्यरत आहेत.)

## दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा ग्रंथ पुरस्कार


संपत देसाई


महादेव कांबळे


दत्ता घोलप


दिनकर कुटे


संग्राम गायकवाड


अलोक जत्राटकर


गायत्री शिंदे

# गायकवाड, देसाई यांना पुरस्कार

कोल्हापूर टाइम्स टीम

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्यावतीने देण्यात येणाऱ्या ग्रंथ पुरस्काराची घोषणा करण्यात आली. संग्राम गायकवाड, दिनकर कुटे, संपत देसाई, दत्ता घोलप, अलोक जत्राटकर, महादेव कांबळे यांच्या पुस्तकांची पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली. रविवारी (ता. १२) सकाळी अकरा वाजता लोकसाहित्याच्या अभ्यासिका डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे.

संग्राम गायकवाड यांच्या 'आटपाट देशातील गोष्टी' या कादंबरीला देवदत्त पाटील पुरस्कार जाहीर करण्यात आला. शंकर खंडू पाटील पुरस्कार दिनकर कुटे यांच्या 'कायधूळ' कथासंग्रहाला मिळाला. दत्ता घोलप यांच्या 'आशय आणि अविष्कार' या मराठा कांदबरीला कृ. गो. सूर्यवंशी पुरस्कार जाहीर करण्यात आला. अण्णा भाऊ साठे पुरस्कार संपत देसाई यांच्या पुस्तकाला मिळाला. 'एका लोकलढ्याची यशोगाथा' असे पुस्तकाचे नाव आहे. अलोक जत्राटकर यांच्या 'निखळ जागर संवेदनाचा' पुस्तकाला चैतन्य माने पुरस्कार देण्यात आला आहे. महादेव कांबळे यांच्या 'वेदनांकित घुंगराचे संदर्भ' यांच्या काव्य संग्रहाला शैला सायनाकर पुरस्कार जाहीर झाला.

## 'दमसा'चे रविवारी पुरस्कार वितरण

बालवाङ्मय पुरस्कार कुमारी गायत्री शिंदे हिच्या 'माझा राजा शाहूराया' या पुस्तकाला मिळाला आहे.

गो. मा. पवार पुस्कार वि. दा. वासमकर यांच्या 'मराठीतील कलावादी समीक्षा' या ग्रंथाला मिळाला आहे. डॉ. विजय निंबाळकर पुरस्कार २४ पुस्तकांना मिळाला आहे. त्यामध्ये संजय कांबळे यांच्या सम्यक समीक्षा, रवी राजमाने यांच्या वाळवाण, भास्कर जाधव यांच्या महाप्रस्थान, जीवन साळोखे यांच्या वर्तमानाचे टोक, श्रीधर कुदळे यांच्या चैत्र पालवी, दत्ता पाटील व नीलेश शेळके यांच्या समकालीन मराठी साहित्य, उर्मिला आगरकर यांच्या मनी मानसी, दत्तात्रय मानुगडे यांच्या आजीची पोथडी, सोनाली नवांगुळ यांच्या जॉयस्टिक, रघुराज मेटकरी यांच्या सह्याद्रीच्या खोऱ्यात, सलीम मुल्ला यांच्या ऋतुफेरा, सुनील जंवजाळ यांच्या काळीजकाटा, सुनील पाटील यांच्या महर्षी महेश योगी, धनाजी घोरपडे यांच्या गाऱ्हाणं, महेशकुमार कोष्टी यांच्या ओळंबा, सविता नाबर यांच्या डोन्ट वरी बी हॅपी, अजंली देसाई यांच्या काव्यांजली, योजना मोहिते यांच्या होरपळ आणि हिरवळ, प्रशांत नागावकर यांच्या कॉं. धनाजी गुरव यांची मुलाखत, कबीर वराळे यांच्या किलबिल गोष्टी, दिनेश वाघुंबरे यांच्या मिथकांचा रंगाविष्कार, प्रमोद बाबर यांच्या निळ्या लाटा, किरण कुलकर्णी यांच्या बंधन या पुस्तकांचा समावेश आहे अशी माहिती उपाध्यक्ष गौरी भोगले, डॉ. विनोद कांबळे यांनी दिली.

# विद्यापीठाचा लवकरच तंजावर विद्यापीठाशी सामंजस्य करार

## तंजावर भेटीत कुलगुरूंची यशस्वी चर्चा; सरस्वती महाल ग्रंथालयाशी होणार करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तंजावर (तमिळनाडू) येथील तमिळ विद्यापीठ व सरस्वती महाल ग्रंथालय यांच्यासमवेत तंजावर पेपर्स, तंजावरी मराठी भाषा अभ्यासासंदर्भात सामंजस्य करार करण्याबाबत तमिळ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सी. बालसुब्रम्हण्यम यांच्याशी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची यशस्वीपणे चर्चा झाली.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी यासंदर्भात नुकतीच विद्यापीठाच्या अभ्यासकांसमवेत तंजावरला भेट दिली. तंजावर येथील तमिळ विद्यापीठाने मराठा इतिहास व मराठी भाषेसंदर्भातील चाळीस हजारांहून अधिक कागदपत्रे जतन करून ठेवली आहेत. विद्यापीठाकडून मोडी कागदपत्रांचे भाषांतर कार्यही मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्यामुळे विद्यापीठाशी तंजावर पेपर्स व तंजावरी मराठी भाषा अभ्यासासंदर्भात सामंजस्य करार विचाराधीन होता. सरस्वती महल ग्रंथालयात मोडी कागदपत्रांसह हजारो मराठी ग्रंथांचे जतन केलेले असल्याने संशोधकांना अभ्यासासाठी ते सहज उपलब्ध व्हावे, यासाठी ग्रंथालयाबरोबर सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयामध्ये बैठक झाली. तंजावरला मराठी अध्यासन व शिवाजी विद्यापीठात तमिळ अध्यासन स्थापन करण्यासंदर्भात चर्चा झाली. शिवाजी विद्यापीठ नवे म्युझियम साकारत असून म्युझियममध्ये तंजावर येथील मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित दालन उभारण्यासंदर्भातही सकारात्मक चर्चा झाली. कुलसचिव मुथ्थुकुमार, डॉ. विवेकानंद गोपाळ, डॉ. जयकुमार, समिती सदस्य डॉ. अवनीश पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. निलांबरी जगताप, गणेश नेर्लेकर-देसाई उपस्थित होते.



**कोल्हापूर : तंजावर येथील बैठकीत तमिळ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सी. बालसुब्रम्हण्यम यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. तंजावरचे शिवाजीराजे भोसले, कुलसचिव मुथ्थुकुमार, डॉ. अवनीश पाटील, डॉ. विवेकानंद गोपाळ. (छाया : पप्पू अत्तार)**

### मराठ्यांच्या इतिहासात तंजावर महत्त्वाचे

तमिळनाडूतील तंजावर येथे साडेतीनशे वर्षांपूर्वी इ. स. १६७६ ला मराठ्यांनी राज्य स्थापन केले. शहाजीराजेंचे पुत्र व छत्रपती शिवाजी महाराजांचे बंधू व्यंकोजी यांनी हे राज्य स्थापन केले. तेव्हापासून ब्रिटिशांनी १८५५ ला संस्थान खालसा करेपर्यंत तेथे मराठा अंमल होता. दोनशे वर्षांमध्ये अकरा राजांनी राज्यकारभार केला. त्यांच्या कारकिर्दीत तेथे मराठी संस्कृती रुजली. मराठ्यांच्या इतिहासात तंजावरचे राज्य हा एक महत्त्वाचा भाग असून तंजावरच्या अभ्यासाशिवाय मराठ्यांचा इतिहास पूर्ण होत नाही. त्यामुळे तंजावर राजघराण्याचे हजारो पेपर्स, इतर ऐतिहासिक कागदपत्रे, वस्तू, शिल्पे, चित्र, शिलालेख, ग्रंथ अभ्यासणे हे मराठा इतिहासाच्या अभ्यासात महत्त्वाचे आहेत.

# आक्काताई पाटील महाविद्यालयास नॅकचे 'बी' मानांकन

**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयाला नॅकच्या तिसऱ्या फेरीच्या मूल्यांकनात बी + (२.५७) मानांकन मिळाले आहे. या महाविद्यालयाची स्थापना १९८४ साली झाली असून मुलींच्यासाठी स्वतंत्र शिक्षणाची सोय असलेले तालुक्यातील हे एकमेव महाविद्यालय आहे. नॅक बेंगळूरकडे मूल्यांकनासाठी स्वयंअध्ययन अहवाल हा महाविद्यालयाने डिसेंबर २०१८ ला सादर केला होता. विद्यार्थिनी सर्वे क्षण व कागदपत्रांची पडताळणी असे ऑनलाईन टप्पे यशस्वीपणे पार पडले. या मूल्यांकनाचा अंतिम टप्प्यात नॅक कमिटीची महाविद्यालय भेट झाली होती. महाविद्यालयाचे नॅक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्राचार्य डॉ. अनिल पाटील , समन्वयक प्रा. संपदा शिंदे सह समन्वयक प्रो. सोमनाथ गायकवाड, प्रो. सुधाकर इंडी यांनी परिश्रम घेतले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, माजी प्राचार्य डॉ. शैलजा साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
8 MAY 2019
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अभिवादन

कोल्हापूर (प्रतिनिधी) : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, आयक्यूएसीचे संचालक डॉ. आर.के. कामत, अधिष्ठाता डॉ. ए.एम. गुरव, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे उपस्थित होते.

18 MAY 2019

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी बनविली इलेक्ट्रिक बाईक

## विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागात निर्मिती; तीन तास चार्जिंगवर ९० कि.मी.


**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील बी. टेक. इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी बॅटरीवर चालणाऱ्या इलेक्ट्रिक बाईकची निर्मिती केली.

तंत्रज्ञान अधिविभागातील ओंकार पोखरकर, क्षितिज लालसरे आणि अनुजा मोहिते यांचे बॅटरीवर चालणारी मोटारसायकल बनविण्याचे प्रयत्न अनेक दिवसांपासून सुरू होते. त्यानुसार विभागाचे समन्वयक डॉ. शामकुमार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रज्ञान अधिविभागात मोटारसायकल डिझाईन केली. ही मोटारसायकल संपूर्णत: बॅटरीवर चालणारी असून ती चालविण्यासाठी कुठल्याही प्रकारच्या इंधनाची आवश्यकता लागत नाही. इंधनासाठी खर्च लागत नसल्याने खर्चामध्ये पूर्णत: बचत होते. या मोटारसायकलमध्ये स्पीडोमीटर, इंडिकेटर, हॉर्न, ब्रेक, एक्स्लेरो मीटर अशा प्रकारच्या सुविधा आहेत. ही मोटारसायकल चालवताना नेहमीचे वाहन चालवल्यासारखा अनुभव येतो.

●बॅटरी वगळता मोटारसायकलचा खर्च फक्त चौदा हजार इतका आला आहे. ही मोटारसायकल चालवताना कुठल्याही अडचणींचा सामना करावा लागत नाही. ही मोटारसायकल विद्यार्थ्यांनी दैनंदिन कामकाजासाठी वापरली असून १०० कि.मी. पेक्षा जास्त अंतर पार केले आहे.

तीन तास चार्ज केल्यानंतर ही मोटारसायकल अंदाजे ९० कि.मी. धावते व जास्तीत जास्त स्पीड हे ताशी ४० कि.मी. आहे. यासाठी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ.जयदीप बागी यांचे प्रोत्साहन मिळाले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



"लहानपणापासूनच बाईकची आवड आहे. मोटारसायकलला येणाऱ्या समस्या व पेट्रोलचे वाढते दर लक्षात घेता इको फ्रेंडली बाईक बनविली आहे. ही मोटारसायकल सध्या विद्यापीठात वापरत असलो तरी इतर ठिकाणांहून याची मागणी येत आहे. – **ओंकार पोखरकर**, विद्यार्थी, बी. टेक.

# महात्मा बसवेश्वर यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारी महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. आर. व्ही. गुरव, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या कार्याचा आढावा घेतला.

सकाळ

# ‘दमसा’चे विविध ग्रंथ पुरस्कार जाहीर

## गायकवाड, कुटे, देसाई, घोलप, जत्राटकर, कांबळे याच्या पुस्तकांची निवड

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या २०१८ मधील ग्रंथ पुरस्कारासाठी संग्राम गायकवाड, दिनकर कुटे, संपत देसाई, दत्ता घोलप, आलोक जत्राटकर, महादेव कांबळे याच्या पुस्तकांची निवड करण्यात आली. रविवारी (ता. १२) शाहू स्मारक भवनाच्या मिनी सभागृहात डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे. दरवर्षी पश्चिम महाराष्ट्रासह कर्नाटकमधील साहित्यिक व त्यांच्या साहित्यकृतींना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येते. साहित्यप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन साहित्य सभेच्या गौरी भोगले, सहकार्यवाह डॉ. विनय कांबळे यांनी केले आहे.

**पुरस्कारप्राप्त पुस्तक व लेखक असे :**

देवदत्त पाटील पुरस्कार- आटपाट देशातल्या गोष्टी (कादंबरी), संग्राम गायकवाड, शंकर खंडू पाटील पुरस्कार- कायधुळ (कथासंग्रह) दिनकर कुटे.

अण्णा भाऊ साठे पुरस्कार- एका लोकलढ्याची यशोगाथा- संपत देसाई, कृ. गो. सूर्यवंशी पुरस्कार- मराठी कादंबरी; आशय आणि आविष्कार (संकीर्ण)- दत्ता घोलप, चैतन्य माने पुरस्कार- निखळ जागर संवेदनांचा- आलोक जत्राटकर, शैला सायनाकर पुरस्कार- वेद्रांकित गुंघरांचे संदर्भ- महादेव कांबळे, बालवाङ्मय पुरस्कार- माझा राजा शाहूराजा- गायत्री शिंदे, विशेष पुरस्कार- डॉ. गो. मा. पवार पुरस्कार- मराठीतील कलावादी समीक्षा वि. दा. वासमकर.

डॉ. विजय निंबाळकर पुरस्कार- सम्यक समीक्षा- संजय कांबळे, वाळवान- रवी राजमाने, महाप्रस्थान- भास्कर जाधव, वर्तमानाचे टोक- जीवन साळोखे, चैत्रपालवी- श्रीधर कुडळे, समकालीन मराठी साहित्य- दत्ता पाटील, नीलेश शेळके, मनीमानसी- ऊर्मिला आगरकर, आजीची पोतडी- दत्तात्रय मनुगडे, जॉयस्टिक- सोनाली नवांगुळ, सह्याद्रीच्या खोऱ्यात- रघुराज मेटकरी, रुतुफेरा- सलीम सरदार मुल्ला, काळीज काटा- सुनील जवंजाळ, महर्षी महेश योगी- सुनील पाटील, गाऱ्हाणं- धनाजी घोरपडे, ओळंबा- कोष्टी, डोंट वरी बी हॅपी- सविता नाबर, काव्यांजली- अंजली देसाई, होरपळ आणि हिरवळ- योजना मोहिते, धनाजी गुरव यांची मुलाखत- प्रशांत नागावकर, किलबिल गोष्टी- कबीर व्हाराले, मिथकांचा रंगाविष्कार- दिनेश वागुबरे, निळ्या लाटा- प्रमोद बाबर, बंधन- किरण कुलकर्णी.


सकाळ

# उपग्रहाच्या मदतीने दुष्काळी गावांचे सर्वेक्षण

## शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागाच्या विद्यार्थ्यांचा यशस्वी प्रयोग

**ओंकार धर्माधिकारी :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागात 'पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन जिओ इन्फॉरमेटिक' हा अभ्यासक्रम आहे. या विभागातील विद्यार्थ्यांनी उपग्रहाच्या मदतीने माण तालुक्यातील (जि.सातारा) दुष्काळी गावांचे सर्वेक्षण केले. या अंतर्गत त्यांनी गावात जाऊन माहिती संकलित केली. उपग्रहाच्या मदतीने तेथील पिकांची स्थिती, भूगर्भातील पाणीपातळी, या दशकातील पर्जन्यप्रमाण,



दहा वर्षांतील दुष्काळाची तीव्रता या गोष्टींची माहिती संकलित केली. याचा अहवाल त्यांनी शासनाला सादर केला आहे.

पीक आणेवारी पद्धतीने दुष्काळी भागाचे सर्वेक्षण करण्याची पद्धत पूर्वापार आहे, मात्र आता काही सर्वेक्षणांसाठी उपग्रहाची मदत घेतली जाते. यामुळे अचूकतेबरोबरच विविध दृष्टिकोनांतून माहिती संकलित केली जाते. याचे स्वतंत्र शास्त्र विकसित झाले असून शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागात याबाबतचा 'पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन जिओ इन्फॉरमेटिक' हा अभ्यासक्रम सुरू आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील गावांचे सर्वेक्षण केले. त्यांना दुष्काळग्रस्त भूभागाची नेमकेपणाने निश्चिती आली. त्याचबरोबर पिकांची स्थिती, त्या परिसरातील दुष्काळी काळातील तापमान, हवेतील आर्द्रता दशकातील पर्जन्याचे प्रमाण, वेळा, स्वरूप यांबाबतही विस्तृत माहिती मिळाली. अशाच पद्धतीने त्यांनी पाणलोट विकास कार्यक्रमासाठीही उपग्रहाद्वारे सर्वेक्षण केले. यात जमिनीची स्थिती, उतार, पाण्याची उपलब्धता, जमिनीला पडलेल्या भेगांची खोली, रुंदी याचीही

पान २ वर »

### उपग्रह सर्वेक्षणाची वैशिष्ट्ये

उपग्रहामुळे ऑप्टिकल रिमोट सेन्सर, थर्मल रिमोट सेन्सर यांआधारे माहिती घेता येते. यामुळे तेथील तापमान, आर्द्रता, पाणथळ जागा यांची अचूक माहिती मिळते. याबाबतची वर्षभरातील माहितीही उपग्रह देतो. थ्रीडी पिक्चरमुळे शहरी भगातील सर्वेक्षणे करणे अधिक सोपे होते.

" पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन जिओ इन्फॉरमेटिक या अभ्यासक्रमासाठी ३० विद्यार्थ्यांची बॅच आहे. भविष्यात संरक्षण, कृषी, टाऊन प्लॅनिंग यासह बहुतांशी क्षेत्रांत उपग्रहाद्वारे सर्वेक्षणे केली जातील. विद्यार्थ्यांनी शासकीय संस्थांच्या माध्यमातून केलेली ही सर्वेक्षणे लोकोपयोगी आहेत.

– प्रा. डॉ. सचिन पन्हाळकर,
विभागप्रमुख, भूगोल विभाग

सकाळ

# उपग्रहाच्या मदतीने दुष्काळी गावांचे सर्व्हेक्षण

» पान १ वरून

पाहणी उपग्रहाच्या माध्यमातून केली जाते. यामुळे पाझर तलावांची जागा निश्‍चिती खात्रीशीर होते. विद्यार्थ्यांनी उपग्रहाच्या मदतीने भुदरगड तालुक्यातील जमिनींचे गटनंबर निहाय सर्व्हेक्षण केले आहे. पंचगंगा नदीची पूररेषा निश्‍चितीही या विद्यार्थ्यांनी उपग्रहाद्वारे केली. जंगलांना लागणाऱ्या आगींबाबतही सर्व्हेक्षणाचे काम या विभागात सुरू आहे.

Kolhapur, Kolhapur-Today
08/05/2019 Page No. 2

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 MAY 2019
तरुण भारत



कोल्हापूर : व्याख्यानात मार्गदर्शन करताना शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर, सोबत ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर.

# शाहू महाराजांचा बहुजनांच्या वृत्तपत्रांना मदतीचा हात

प्रतिनिधी
कोल्हापूर

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी तत्कालीन परिस्थितीत ब्रिटिश अभिजन वर्गात असताना ब्राम्हणेतर चळवळ उभारली. बहुजनांचे प्रश्न मांडणाऱ्याच नव्हे तर सर्वच वृत्तपत्रांना त्यांनी मदतीचा हात दिला. श्रीपतराव शिंदे यांनी काढलेल्या 'विजय मराठा' वृत्तपत्रालाही आर्थिक मदत केली. ब्राम्हणेतर चळवळ जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी बहुजनांच्या वृत्तपत्रांना जाणीवपूर्वक मदत केली, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर यांनी केले.

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त शाहू स्मारक येथील आयोजित आयोजित व्याख्यानात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते. डॉ. जत्राटकर यांनी शाहू महाराज आणि बहुजन पत्रकारिता विषयावर मांडणी केली.

डॉ. जत्राटकर म्हणाले, ज्ञान वर्तमान व मनोरंजन करण्याचे काम त्याकाळच्या वृत्तपत्रांनी केले. सत्यशोधक वृत्तपत्राने शोषित, वंचित, कामगारांच्या प्रश्नाला वाचा फोडली. दीनबंधूनेही, तरुण मराठा, शिवछत्रपती, बहिष्कृत भारत आदी वृत्तपत्रांनी सर्वसामान्यांना न्याय दिला. यातील काही वृत्तपत्रे भविष्यात बंद पडली. शाहू महाराज यांनी बहुजन वृत्तपत्र बरोबर ग्रंथमाला, सुधारक यासारख्या अभिजन वृत्तपत्रांना ही मदत केल्याचे दाखले आहेत. बेळगाव येथील तरुणांनी सुरु केलेल्या राष्ट्रवीरला देखील आर्थिक मदत करीत प्रोत्साहन दिले.

**विद्यापीठातील जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर यांचे प्रतिपादन**

प्रास्ताविक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले. राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टचे प्रशासन अधिकारी राजदीप सुर्वे यांनी आभार मानले. यावेळी दलितमित्र व्यंकप्पा भोसले, डॉ. रत्नाकर पंडित, नामदेव कांबळे, प्राचार्य टी. एस. पाटील, राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टचे व्यवस्थापक कृष्णाजी हारुगडे, युवराज कदम आदी उपस्थित होते.